




दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २७१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१३ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## कच्च्या तेलापेक्षा खाद्यतेलाचे संकट अधिक; लवकरच तुटवडा निर्माण होण्याची शक्यता

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, मुंबई :** भारत दरवर्षी दोन प्रमुख तेल स्रोतांवर प्रचंड पैसा खर्च करतो एक म्हणजे कच्चे तेल , जे वाहने आणि उद्योगांना ऊर्जा पुरवते, आणि खाद्यतेल , जे प्रत्येक घरातील स्वयंपाकघरात वापरले जाते. कच्च्या तेलाचे संकट मोठे दिसत असले तरी, खरी चिंता आता खाद्यतेलाबाबत वाढत आहे. याचे कारण केवळ महागाईच नाही, तर परकीय अवलंबित्व, जागतिक राजकारण आणि बदलत्या खाण्याच्या सवयी हे देखील आहे.

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८८% तेल परदेशातून खरेदी करतो. २०२५-२६ या आर्थिक वर्षात, देशाने सुमारे १२१.८अब्ज डॉलर्स किमतीचे कच्चे तेल आयात केले. ही रक्कम लक्षणीय आहे, परंतु गेल्या काही वर्षांत भारताने या क्षेत्रात आपले धोरण लक्षणीयरीत्या मजबूत केले आहे. युक्रेन युद्धानंतर जेव्हा पाश्चात्य देशांनी रशियावर निर्बंध लादले, तेव्हा भारताने स्वस्त रशियन तेलाचा फायदा घेतला. काही वर्षांपूर्वीपर्यंत रशिया भारतासाठी एक खूप छोटा पुरवठादार होता, पण आता तो कच्च्या तेलाचा सर्वात मोठा पुरवठादार बनला आहे.

भारताने केवळ तेल खरेदी करण्याची पद्धतच बदलली नाही, तर आपल्या पुरवठ्याचे पर्यायही वाढवले आहेत. यामुळे पश्चिम आशियावरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी झाले आणि किमतींच्या धक्क्यांपासून दिलासा मिळाला. भारताने केवळ पुरवठादार बदलण्यापुरते स्वतःला मर्यादित ठेवलेले नाही. देशाने विशाखापट्टणम, मंगळुरू आणि पदूर येथे Strategic Petroleum Reserves देखील तयार केले आहेत. याचा अर्थ असा की, आणीबाणीच्या परिस्थितीत देश काही काळासाठी आपल्या स्वतःच्या साठ्यांवर अवलंबून राहू शकतो. शिवाय, सुमारे ६९० अब्ज डॉलर्सचा परकीय चलन साठा आयातीचा



दबाव व्यवस्थापित करण्यास देखील मदत करतो. भारतीय रिफायनर्स आता कच्च्या तेलाच्या विविध ग्रेडवर प्रक्रिया करण्यास सक्षम आहेत. सरकार, परराष्ट्र मंत्रालय आणि तेल कंपन्या जागतिक परिस्थितीनुसार त्यांच्या खरेदी धोरणांमध्ये बदल करण्यासाठी एकत्र काम करू शकतात. यामुळेच तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, कच्च्या तेलाचे संकट निश्चितच कठीण असले तरी, भारताकडे त्याचा सामना करण्यासाठी संसाधने आहेत.

खाद्य तेलाची समस्या कच्च्या तेलापेक्षा अधिक गुंतागुंतीची मानली जाते. भारत आपल्या खाद्य तेलाच्या गरजेपैकी सुमारे ६० टक्के आयात करतो. गेल्या वर्षी, देशाने परदेशातून सुमारे १७.५९ अब्ज डॉलर्स किंवा अंदाजे १.६१ लाख कोटी रुपयांचे खाद्य तेल खरेदी केले. सर्वात मोठी समस्या ही आहे की भारताला वेगवेगळ्या देशांकडून वेगवेगळ्या प्रकारचे तेल खरेदी करावे लागते. पाम तेल प्रामुख्याने इंडोनेशिया आणि मलेशियामधून, सोयाबीन तेल अर्जेंटिना आणि ब्राझीलमधून, तर सूर्यफूल तेल रशिया आणि युक्रेनमधून येते. याचा अर्थ असा की, केवळ एकाच देशाकडून पुरवठा वाढवून ही समस्या सोडवता येणार नाही. जर कोणत्याही एका प्रदेशात संकट निर्माण झाले, तर त्याचा थेट परिणाम भारताच्या खाद्यसंस्कृतीवर होतो.

## मिनी माथेरान च्या नावाखाली माथेरानच्या अस्तित्वावर घाला?

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१२, माथेरान :** माथेरान हे केवळ पर्यटनस्थळ नाही, तर महाराष्ट्राच्या पर्यावरण, इतिहास आणि नैसर्गिक वारशाची ओळख आहे. वाहनमुक्त डोंगररांग, लाल मातीचे रस्ते, घनदाट जंगल, पॉईंट्स आणि शांत वातावरण यामुळे माथेरानची वेगळी ओळख निर्माण झाली. पण आज हाच माथेरान नावाचा वापर कुठेही, कशासाठीही केला जात आहे आणि त्यावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा मात्र शांत आहे.

सध्या मिनी माथेरान, माथेरान व्हॅली, न्यू माथेरान, माथेरान फॉरेस्ट व्ह्यू अशा नावांनी अनेक फार्महाऊस, रिसॉर्ट आणि पर्यटन प्रकल्प उभे राहत आहेत. विशेष म्हणजे या ठिकाणांचा माथेरानशी थेट संबंध नसतानाही माथेरानचे नाव वापरून पर्यटकांना आकर्षित केले जात आहे. यामुळे मूळ माथेरानची ओळखच धोक्यात येत आहे. एखाद्या ऐतिहासिक आणि पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील शहराचे नाव कोणीही वापरावे आणि प्रशासन गप्प बसावे, ही गंभीर बाब आहे.

गंभीर मुद्दा म्हणजे आदिवासी ११ वाड्यांच्या विकासाच्या प्रश्नाला मिनी माथेरान असे गोंडस स्वरूप देऊन मूळ प्रश्नाला वेगळे वळण दिले जात आहे. आदिवासी भागाचा विकास व्हायलाच हवा, रस्ते, पाणी, शिक्षण, रोजगार या सुविधा मिळायलाच हव्यात; पण त्या विकासासाठी माथेरानचे नाव वापरण्याची गरज काय? स्थानिक ओळख निर्माण करण्याऐवजी म



ाथेरानच्या नावावर बाजार मांडण्याचा प्रयत्न का केला जातोय, हा प्रश्न उपस्थित होतो.

दुसरीकडे, स्वतः माथेरानमध्ये वर्षानुवर्षे तेच पॉईंट्स, तेच घोडे, तीच हातरिक्षा आणि तीच व्यवस्था यापलीकडे कोणतीही आधुनिक पर्यटन संकल्पना विकसित झाली नाही. पर्यटकांच्या मनोरंजनासाठी दर्जेदार उपक्रम नाहीत. स्थानिक तरुणांसाठी नव्या व्यवसाय संधी नाहीत. स्वच्छतेवर करोडो रुपये खर्च होतात, पण जंगलात आणि पॉईंट्सवर कचरा दिसतोच.

आदिवासी वाडी ट्रेकिंग प्रशिक्षण गाइड व्यवस्था ट्रेकिंग मार्ग आहेत, माथेरान हेरिटेज बंगले, जॉगिंग ट्रॅक . ठिकठिकाणी स्वच्छतेचे बोर्ड शंभर टक्के स्वच्छता कटिबंध फॉरेस्ट गार्डन वेताळेश्वर नैसर्गिक झरा . अगदी गार्डन अत्याधुनिक पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या योजना संकल्पना राबवण आवश्यक आहे,यांची माहिती केंद्र विकसित करणे, प्रशिक्षित गाईड व्यवस्था नाही. क्लीन मार्शल, पर्यटक मार्गदर्शन, माहिती केंद्र, रात्रीचे सांस्कृतिक उपक्रम, नैसर्गिक अभ्यास पर्यटन, डिजिटल प्रचार अशा अनेक गोष्टींची कमतरता आहे.

याचबरोबर माथेरानसाठी उभारण्यात आलेल्या ऑडिओ. असे अनेक संकल्पना पर्यटकांच्या दृष्टीने विचार करण्याची वेळ आहे. पाणीपुरवठा योजनेबाबतही गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. कुंभे-नेरळ येथून माथेरानसाठी टाकण्यात आलेली जलवाहिनी ही मूळतः माथेरानच्या नागरिक आणि पर्यटकांच्या पाणी गरजांसाठी होती. मात्र या मार्गावर तब्बल ५८ अनधिकृत नळ कनेक्शन दिले.माथेरानच्या हक्काच्या पाण्यावरच डल्ला मारला जात आहे का, हा मोठा प्रश्न आहे. उन्हाळ्यात विशेषतः मे महिन्यात माथेरानमध्ये पाणीटंचाई निर्माण होते, पर्यटक नागरिक त्रस्त होतात, हॉटेल व्यवसायावर परिणाम होतो; पण दुसरीकडे पाणी गळती, अनधिकृत वापर आणि वाटेतच होणारा पुरवठा यामुळे माथेरानपर्यंत पूर्ण पाणी पोहोचत नाही ही गंभीर बाब म्हणजे कुंभे ते माथेरानपर्यंत जे काही पाणी येते त्या संपूर्ण योजनेचे बिल मात्र सरासरीच्या हिशोबाने माथेरानच्या नागरिकांवर लादले जाते. म्हणजे पाणी चोरी, गळती आणि अनधिकृत वापराचा आर्थिक भारही माथेरानकरांनीच सहन करायचा का?

माथेरानमध्ये अनेक राजकीय सत्ताधारी आले आणि गेले. प्रत्येकाने मोठी आश्वासने दिली; पण प्रत्यक्षात पर्यटकांना नवीन अनुभव देणारी एकही मोठी संकल्पना टिकली नाही. जे काही सुरू झाले ते काही महिन्यांत बंद पडले. परिणामी पर्यटक कंटाळले आणि पर्यायी पर्यटनस्थळांकडे वळू लागले. आता तर माथेरानच्या आसपासच्या भागात वेगाने फार्महाऊस संस्कृती वाढत आहे. उद्या या ११ आदिवासी वाड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रिसॉर्ट आणि खासगी प्रकल्प उभे राहिले, तर मूळ माथेरानचे अस्तित्व आणि अर्थव्यवस्था धोक्यात येऊ शकते.

त्यामुळे आता भावनिक भाषणे नव्हे, तर कठोर निर्णयांची गरज आहे. माथेरान नगरपालिकेने तातडीने ठराव करून माथेरान हे नाव कोणत्याही खासगी प्रकल्प, हॉटेल, फार्महाऊस किंवा पर्यटनस्थळासाठी परवानगीशिवाय वापरता येणार नाही, असा कायदेशीर निर्णय घ्यावा. तसेच पाणीपुरवठा योजनेचे संपूर्ण ऑडिट करून अनधिकृत नळजोडण्यांवर कठोर कारवाई करावी. माथेरानचा ब्रँड, पर्यावरण आणि भवितव्य वाचवायचे असेल तर आता ठोस पावले उचलावीच लागतील.अन्यथा भविष्यात मूळ माथेरान फक्त इतिहासात राहील आणि आजूबाजूची मिनी माथेरानच पर्यटकांना दिसतील.

## अहिल्यानगर जिल्ह्यात उष्मालाटेचा 'येलो अलर्ट' उष्माघातापासून बचावाचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, अहिल्यानगर :** भारतीय हवामान खात्याद्वारे निर्गमित संदेशानुसार,१२ ते १४ मे २०२६ दरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्मालाटेची शक्यता वर्तवण्यात आलेली असून येलो अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील तापमानात गेल्या आठवड्यापासून वाढ होण्यास प्रारंभ झाला आहे. जिल्ह्याचा पारा सोमवारी (ता.१२) ४१ अंश सेल्सिअसवर पोहचला होता. तापमान वाढीने दुपारी संचारबंदी सदृश परिस्थिती निर्माण होत आहे.

जिल्ह्यात तापमान वाढल्याने दुपारी रस्ते ओस पडत आहेत. जिल्हा प्रशासनाच्या वतीने उष्णतेच्या लाटेच्या काळात विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये हवामान उष्ण व दमट राहील. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी कोरडे हवामान वर्तविण्यात आले असून, गेल्या दोन-तीन दिवसांपासून तापमानात काही प्रमाणात वाढ होत आहे.

या पार्श्वभूमीवर उष्माघाताचे मानवी व प्राण्यांच्या आरोग्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

उष्माघाताची लक्षणे दिसताच नागरिकांनी तत्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा. आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी १०७७, १०२, १०४, १०८ व ११२ या क्रमांकांवर संपर्क करावा. नागरिकांनी तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाने पुरेसे पाणी प्यावे. शरीरातील पाणी कमी होऊ नये, म्हणून ओआरएस, लस्सी,ताक,कैरीचे पन्हे व लिंबू पाण्याचा नियमित वापर करावा. दुपारी बारा ते तीन वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळावे.

**पाळीव प्राण्यांची विशेष दक्षता !**

पाळीव प्राण्यांना सावलीत ठेवून वेळेवर पुरेसे पाणी घ्यावे. उन्हापासून जनावरांचे संरक्षण होईल,याची दक्षता घ्यावी. पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. नागरिकांनी या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन गिते यांनी केले आहे.

## जिंतूर तहसीलसमोर धरणे आंदोलन आंबेडकरी समाज आक्रमक

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१२, जिंतूर :** जिंतूर तालुक्यातील रायखेडा येथील नागार्थी बुद्ध विहार तसेच सेनगाव तालुक्यातील वाढोणा फाटा परिसरातील बुद्ध विहारात भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची विटंबना झाल्याच्या घटनेमुळे आंबेडकरी समाजात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणातील दोषींना तात्काळ अटक करावी तसेच संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, या मागणीसाठी जिंतूर तहसील कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. चला जिंतूर चला जिंतूर अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला असून बौद्ध बांधवांनो जागे व्हा, अन्यायाविरुद्ध एकत्र या! असे आवाहन आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आले आहे. आंदोलनकर्त्यांनी प्रशासनासमोर विविध मागण्या मांडल्या असून त्यामध्ये बुद्ध मूर्तीची विटंबना करणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करणे, प्रकरणात दिरंगाई करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांचे निलंबन, बुद्ध विहार परिसरातील अतिक्रमण हटविणे तसेच संबंधित ठिकाणी संरक्षण भिंत उभारणे आदी मागण्यांचा समावेश आहे. तसेच सेनगाव तालुक्यातील वाढोणा फाटा येथील प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.



हे आंदोलन १२ मे रोजी सकाळी १० वाजता तहसील कार्यालय, जिंतूर येथे आयोजित करण्यात आले असून आंबेडकरी समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. या आंदोलनामुळे जिंतूर शहरातील सामाजिक वातावरण तापले असून प्रशासनाकडून काय भूमिका घेतली जाते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## एसटी उभारणार २०० चार्जिंग स्टेशन !

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१२, मुंबई :** एसटी महामंडळातील सर्व बसेस २०३५ पर्यंत ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याच्या दृष्टीने राज्य शासन आणि एसटी महामंडळाकडून वेगाने प्रयत्न सुरू आहेत. या अनुषंगाने आवश्यक असलेल्या चार्जिंग सुविधांची उभारणी करण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर राज्यभरात किमान २०० चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार असून, यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्रालयीन दालनात आयोजित बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार गिरीश देशमुख तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले की, २०३५ पर्यंत एसटीच्या सर्व बसेस ई-बसेस करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्या दृष्टीने भविष्यात सुमारे २० हजार ई-बसेससाठी आवश्यक चार्जिंग स्टेशन उभारणे ही काळाची गरज आहे. राज्यभरातील एसटी महामंडळाच्या उपलब्ध जागांवर नियोजित चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी ठराविक क्षेत्र संबंधित विकासकाला देण्यात येईल. त्या ठिकाणी विकासकाकडून आधुनिक चार्जिंग स्टेशन उभारण्यात येतील, जिथे एसटीच्या ई-बसेस चार्ज केल्या जातील.

यासोबतच सुमारे १५०० चौरस फूट जागा संबंधित विकासकाला भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यात येणार असून, इतर वेळेत त्या चार्जिंग स्टेशनवर खासगी वाहनांनाही चार्जिंग सुविधा देण्यास परवानगी असेल. त्यामुळे एसटी महामंडळाला माफक दरात ई-बसेस चार्जिंगची सुविधा उपलब्ध होईल. तसेच विकासकाने वापरलेल्या जागेचे भाडे आणि खाजगी वाहनांच्या चार्जिंगमधून मिळणाऱ्या नफ्यातील ठराविक हिस्सा महसूल स्वरूपात एसटी महामंडळाला प्राप्त होणार आहे.

अक्षराज






## सूर्यनारायण कोपला

राज्यात सूर्य नारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. सध्या राज्यात प्रचंड उकाडा जाणवत असुन जवळपास सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या पुढे गेले आहे. मागील आठवड्यापासून तर राज्यात प्रचंड उकाडा जाणवत आहे. विदर्भ, मराठवाड्यासह संपूर्ण राज्य उकाड्याने हैराण झाले आहे. या महिन्याअखेर राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल असा अंदाज आहे. यावर्षी उन्हाळा कडक असेल असा इशारा हवामान तज्ज्ञांनी दिला होता तो खरा ठरताना दिसत आहे. मागील महिन्यात म्हणजे एप्रिल महिन्यातच याची चाहूल लागली होती गेल्या महिन्यातही सर्वच शहरांचे तापमान वाढले होते. मे महिन्यात तर तापमान उच्चांक गाठत आहे म्हणूनच मे महिना जनतेसाठी जिकारीचा ठरत आहे. या महिन्यात कमाल तापमानाने उच्चांक गाठला आहे. विदर्भात तर उष्णतेची लाट आली आहे. विदर्भातील काही शहरांचे तापमान ४५ अंशाच्या पुढे गेले आहे. पारा ४५ अंशाच्या घरात गेल्याने नागरिकांची अक्षरशः होरपळ होत आहे. विदर्भासह राज्यातील काही भागात उष्णतेच्या प्रचंड लाटा वाहत आहेत. कोरडे व उष्ण वारे आणि वातावरणातील आर्द्रतेचे घटलेले प्रमाण यामुळे या उष्णतेच्या लाटा आल्याचे तज्ज्ञ सांगत आहेत. तापमानाचा पारा वाढत असल्याने उन्हाचा त्रास होऊन उष्माघाताचे प्रमाण वाढले आहे. राज्यात उष्माघाताने काहींचा बळीही गेला आहे. सध्या राज्यात उष्माघाताचे १६४ रुग्णांची नोंद झाली आहे. अर्थात ही संख्या फक्त सरकारी दप्तरी नोंद झालेल्या रुग्णांची आहे. नोंद न झालेले शेकडो उष्माघाताचे रुग्ण राज्यात आहेत. राज्यातील वाढते तापमान आणि वाढते उष्माघाताचे रुग्ण पाहता सरकारने नागरिकांना घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे तो योग्यही आहे असे असले तरी आवश्यक कामासाठी, लग्न, देवधर्म कार्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. ग्रामीण भागात कुलदैवतांच्या यात्रा सुरू झाल्यात. कंदुरीचे कार्यक्रम ठिकठिकाणी सुरू आहेत. सण समारंभ साजरे करण्यासाठी, ग्राम दैवतांचे दर्शन घेण्यासाठी, नातेवाईकांच्या भेटीगाठी घेण्यासाठी लोकांची धावपळ सुरू आहे त्यामुळे उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागत आहे. उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिमाण माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. उन्हाळ्यात मधुमेहासारख्या व्याधी असणाऱ्या व्यक्तींनी विशेष खबरदारी घ्यायला हवी. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळेत उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता देखील असते. उष्माघातापासून वाचण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावेच. दुपारी बारा ते चार यावेळेत घराबाहेर पडूच नये. काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना, टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कापडे परिधान करावेत. उन्हात काम करत असलेल्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा. तापमान वाढले की शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे डिहायड्रेशन होते. डिहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते त्यामुळे चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये म्हणून सतत पाणी पित रहावे. शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते. घराच्या बाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत घ्यायला विसरू नका. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, भाज्या व फळांचे रस दररोज प्याले तरी हरकत नाही. उन्हाळ्यात आरोग्य बिघडतेच म्हणून प्रत्येकाने उन्हाळ्यात आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. खबरदारी घेऊनच आपण उन्हाच्या तीव्रतेपासून बचाव करू शकतो.

**– श्याम ठाणेदार**

# काटकसरीची 'सप्तसुत्री'



२८ फेब्रुवारी पासून सुरू असलेल्या इराण–ईस्त्रायल मधे युद्धाची ठिणगी पडली त्यात आगीत सर्व जग होरपळत असतांना भारताला देखील युद्धाच्या झळा बसत आहेत आणि त्या दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर होत आहेत. अजुनही युद्ध थांबले नाही केव्हा थांबेल याची शाश्वती नाही. तेल संकटा बरोबरच पावसाळा तोंडावर आल्याने खतांचा प्रश्न निर्माण झाला आहे, दिवसेंदिवस आंतरराष्ट्रीय पातळीवर तेलाच्या किमती वाढत आहे आणि त्याचा परिणाम जनजीवनावर दिसु लागला आहे. संकट गंभीर आहे याची जाणीव झाल्यानेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशापुढे सात सुत्री कार्यक्रम ठेवला आहे यात

**१) विदेशी दौरे टाळा.**
**२) खतांचा वापर कमी करा आणि नैसर्गिक शेतीकडे वळा.**
**३) खाजगी क्षेत्रात वर्क फ्रॉम होमचा अवलंब करा.**
**४) जास्तीत जास्त स्वदेशी खरेदी करा,**
**५) वर्षभर सोने खरेदी टाळा,**
**६) स्वयंपाकात खाद्य तेल कमी वापरा,**
**७) मेट्रो सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा ऊपयोग करा.**

असे आवाहन त्यांनी जनतेला केले. खरोखरच काळ कसोटीचा आहे यात शंका नाही. ऐकिकडे भारताची अर्थव्यवस्था मजबूत आहे, देशात अच्छेदिन आहे, भारत महाशक्ती आहे असे दावे–प्रतिदावे केले जात आहे मात्र सगळी सोंगे वठविता येतात पैशाचे सोंग वठविता येत नाही हे वास्तव आहे. जेव्हा जेव्हा देशाचा विषय येतो तेंव्हा तेव्हा जनता ऊस्फुर्तपणे प्रतिसाद देते हे देशातील जनतेने अनेक वेळा दाखवुन दिले आहे, अलिकडच्या कोरोना काळात याचा प्रत्यय आला होता. मात्र यासाठी राज्यकर्ते, राजकारणी, वरिष्ठ नोकरशहां यांची देखील प्रामाणिक इच्छाशक्ती आणि मानसिकता हवी आणि तसे कृतीतून दिसले पाहिजे. जेव्हा देशात पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका होत होत्या तेव्हा मात्र ईंधन, गॅसची दरवाढ रोखुन धरली, आणि मतदान संपताच व्यावसायिक गॅस सिलेंडर थेट ९९३ रुपयांनी तर पाच किलो गॅसचे सिलेंडर २१० रुपयांनी महाग झाले आणि आता ही सप्तसुत्री जाहीर केली. संकट काही एका दिवसात आले नाही याची नांदी अगोदरच सुरू झाली होती, तेव्हा मात्र फारशी काही ऊपाययोजना केली नाही. निवडणूका पार पडताच जनतेला रिटर्न गिफ्ट मिळु लागले आणि आतातर येणाऱ्या कठीण काळाचे संकेत दिले गेले. विरोधी पक्ष, नेते जेव्हा जेव्हा सरकारला संकटाचे गांभीर्य लक्षात आणुन देतात तेव्हा त्याकडे गांभीर्याने न पहाता विरोधकांना लक्ष केले जाते, देशात पॅनिक बसविण्याचा, देशद्रोही ठरवण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष म्हणजे कुठल्याच विषयावर ना सर्व पक्षीय बैठक बोलावून चर्चा केली जाते ना विरोधी पक्षनेता, विरोधकांना विश्वासात घेतले जाते, मात्र गळ्याशी आले कि विरोधकांकडुन सहकार्याची अपेक्षा केली जाते. देशासाठी वपक्षच काय जनता देखील सरकारला साथ देण्यात सदैव तत्पर आहे मात्र त्यासाठी केवळ मन कि बात करुन चालत नाही तर खऱ्या अर्थाने सबका साथ सबका विश्वास सबका प्रयास असे वातावरण हवे आणि नेमके तेच होत नाही हे वास्तव आहे.

सोने, चांदीचे चढते भाव सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत, लग्न सराई, धार्मिक सण उत्सव, ईतर कार्य असले कि दागदागिने, खरेदी ही अपरिहार्य ठरते आणि जो तो आपापल्या कुवती नुसार अशी खरेदी करतच असतो. सोन्या, चांदीच्या वाढत्या किमतीमुळे नकली दागदागिने खरेदीकडे मोठा वर्ग वळु लागला आहे. सामान्य जनतेच्या आर्थिक क्षमतेपलिकडे सोने चांदी खरेदी गेली आहे, काही धनदांडगे, काळा पैसा असलेले, भ्रष्टाचारातुन पैसा कमावलेले अशा वर्गाकडुन सोने चांदी खरेदी होते मात्र सोने खरेदीची' कुवत' आहेच कोणामध्ये?.. ऐकिकडे जनतेच्या मुलभूत गरजा असलेले आरोग्य, शिक्षण, अन्न वस्त्र निवारा या सगळ्यांसाठी पैसा पुरत नाही तर सोने चांदी खरेदी करणार कोण?. ऐकिकडे देशातील ऐक्यांशी कोटी जनतेला सरकारच्या पाच किलो धान्यावर जगावे लागते त्यांच्या पैकी कोणामधेही सोने चांदी खरेदी वा परदेशात जाण्याची कुवत आहे? गरीब, मध्यमवर्गीय, नोकरदार, कष्टकरी, कामगार हे महिन्याचा हिशेब जुळवण्यासाठी झगडत आहेत. अगोदरचे शेती ऊत्पादनाचे गंभीर संकट असतांना आता खतांचा वापर कमी करावा असे आवाहन केले जाते आणि नैसर्गिक शेतीकडे वळा असे आवाहन केले जाते मात्र यामुळे शेती ऊत्पादन कमी होणार आणि सगळ्यांचेच खाण्याचे वांधे होणार. ऐकिकडे जनतेच्या मुलभूत गरजा असलेले आरोग्य, शिक्षण, अन्न वस्त्र निवारा या सगळ्यांसाठी पैसा पुरत नाही तर सोने चांदी खरेदी करणार कोण?.

देश आर्थिक संकटात आहे, देशासमोर अनेक आव्हाने आहेत, देशावरची कर्ज दोनशे लाख कोटी रुपयांच्या पलिकडे गेले आहे. काटकसर ही काळाची गरज आहे मात्र ती न करता देशाच्या जनतेवर दोनशे लाख कोटी रुपयांच्या वरचे कर्ज कोणी केले? आणि तो पैसा गेला कुठे?. ऐकिकडे देशाची अर्थव्यवस्था मजबूत असल्याचे, तसेच जगातील तिसऱ्या चौथ्या क्रमांकावरील अर्थव्यवस्थेचे दावे–प्रतिदावे केले गेले मग आजची परिस्थिती ही विसंगती आहे.

अगोदरच महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार या समस्या आहेत जनता यासाठी गांभीर्याने झुंजत आहेच तरीही जनता आपापल्या परीने सरकारला साथ देईलच मात्र त्यासाठी कारभारी, पहारेकरी, चौकीदार, राजकिय नेते, कार्यकर्ते, पक्ष, नोकरशहा यांची देखील प्रामाणिक इच्छाशक्ती आणि मानसिकता दिसली पाहिजे. लोकां सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वतःमात्र कोरडेपाषाण असे जनतेला चालणार नाही. बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले असे आचरण अगोदर देशाच्या नेतृत्वाने, राजकिय नेत्यांचे असायला हवे तरच जनता गांभीर्याने प्रतिसाद देईल.ऐकुणच येणारा काळ अमृतकाळातील अच्छेदिनांचा नसेल तर संकटकाळ असेल याचे संकेत मिळु लागले आहेत.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# शहरांतील वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण हवेच !

सर्व सोयी सुविधांनी युक्त असलेली मुंबई समस्त हिंदुस्थानची आर्थिक राजधानी आहे. मुंबई शहराच्या बाबतीत असे म्हटले जाते कि इथे कोणीच उपाशी राहू शकत नाही. तुमची मेहेनत करण्याची सिद्धता असेल, तर तुमचे शिक्षण असो किंवा नसो रोजगाराच्या नानाविध संध्या तुम्हाला इथे सहज उपलब्ध होतात. इथे तुम्हाला लहानमोठे कोणतेही व्यवसाय करायचे असल्यास तुम्हाला भांडवल उपलब्ध करून देणारे अनेक मार्ग आहेत, इथे तुम्हाला राहण्यासाठी किंवा व्यवसायासाठी भाड्याने जागा उपलब्ध आहेत, रहदारीची मुबलक साधने उपलब्ध आहेत. शाळा, महाविद्यालये, बाजारहाट, रुग्णालये अगदी हाकेच्या अंतरावर आहेत. सश्रद्धांसाठी मंदिरे आणि प्रार्थनास्थळे जागोजागी आहेत, पर्यटनासाठी समुद्रकिनारे, प्राचीन ठिकाणे आहेत, मनोरंजनासाठी सिनेमा आणि नाट्यगृहे आहेत. तुमच्या खिशात पैसे आहेत तर इथे अशी कोणतीही वस्तू नाही जी विकत मिळत नाही. मुंबईत नशीब आजमावण्यासाठी आलेल्या आणि गडगंज श्रीमंत झालेल्यांची उदाहरणेही इथे पुष्कळ आहेत त्यामुळ प्रतिदिन देशभरातून लोंढेच्या लोंढे मुंबईकडे रोजगारासाठी धाव घेतात. बांगलादेशी घुसखोरांची तर इथे मोजदादच नाही. मुंबई नजीक असलेल्या ठाणे आणि नवी मुंबई शहराचीही काहीशी हीच स्थिती आहे. वीज, पाणी यांसारख्या अत्यावश्यक बाबींचा पुरवठा करणारे स्रोत, रस्ते, वाहतुकीची साधने मर्यादित असल्याने या वाढत्या लोकसंख्येचा भार त्यावर पडून इथे वर्षनुवर्षे राहणाऱ्या भूमी पुत्रांचे जीवन असह्य झाले आहे. मुंबईतील वाढत जाणारी गर्दी, वाढत्या वाहनांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण, वर्षातील बाराही महिने सुरु असलेल्या विकासकामांमुळे आणि टोलेजंग इमारतींच्या बांधकामांमुळे हवेत मोठ्या प्रमाणात पसरलेले धुळीकण आणि त्यामुळे होणारे वायुप्रदूषण, श्वसन विकार. जमिनीला आणि घरांना मिळणारे सोन्याचे भाव यामुळे मुंबईतील अनेक भूमिपुत्रांनी मुबईतील घरे विकून बदलापूर, कर्जत, वांगणी यांसारख्या ठिकाणी अल्प दारात घरे घेऊन संसार तर थाटले आहेत; मात्र यातील कर्त्या पुरुषांची (कमावत्या महिलांचीही) कार्यालये, कंपन्या मुंबईत असल्याने प्रतिदिन सकाळी मुंबईत येताना आणि सायंकाळी मुंबईतून घरी जाताना त्यांना जीवावर उदार होऊन रेल्वे प्रवास करावा लागतो आहे. लोकल रेल्वेसेवा ही तुलनेने स्वस्त आणि जलद असल्याने तसेच तिन्ही जिल्ह्यांत याचे जाळे पसरलेले असल्याने लोकांकडून प्रवासासाठी या मार्गालाच अधिक पसंती दिली जात आहे. गेल्या काही वर्षांत लोकल रेल्वेवरील भार कमी करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने नानाविध प्रयत्न केले आहेत. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने दोन गाड्यांतील कालावधी अल्प केला, लोकल गाड्यांची संख्या वाढवली, गाड्यांच्या फेऱ्या वाढवल्या, १२ डब्यांच्या लोकलगाड्या १५ डब्यांच्या केल्या, जलद मार्गाचे थांबे वाढवले; मात्र ज्या तुलनेत प्रवाशांची संख्या वाढते आहे त्या तुलनेने हे उपायसुद्धा निष्फळ ठरत आहेत. कार्यालयीन वेळेत रेल्वे गाड्या दुथडी भरून वाहत असतात. गुरांना कोंबावे तशी माणसे या गाड्यांतून कोंबून प्रवास करतात, कितीतरी जण जीव मुठीत घेऊन रेल्वेच्या दाराबाहेर लटकत प्रवास करतात ज्यामध्ये स्त्रियासुद्धा मोठ्या प्रमाणात असतात. लोकल रेल्वेमार्गावर गर्दीच्या वेळेत प्रतिदिन कितीतरी जण धावत्या रेल्वे गाड्यांतून पडून मरण पावतात तर कित्येक जण कायमचे जायबंदी होतात. गर्दीच्या वेळेत प्लॅटफॉर्मवर उतरतानाही बऱ्याचदा अपघात होतात. लोकल रेल्वेवर पडणारा भार कमी करण्यासाठी प्रशासन शहरी भागात मेट्रो रेल्वेचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे; मात्र अनेक ठिकाणी कोणत्या ना कोणत्या कारणामुळे ही कामे थांबलेली आहेत. ज्या ठिकाणी कामे सुरु आहेत, तीही अत्यंत संथगतीने सुरू आहेत. त्यामुळे जेव्हा केव्हा त्या ठिकाणी मेट्रोसेवा सुरु होईल तोपर्यंत लोकसंख्या एव्हढी वाढलेली असेल कि त्या तुलनेत मेट्रोही अपुरी पडावी. मुंबईत अनेक ठिकाणी रस्त्यांचे रुंदीकरण सुरु आहे, मोठमोठे उड्डाणपूल तयार करण्यात आले आहेत, भुयारी मेट्रो मार्गही बनवण्यात आले आहेत. मुंबईत समुद्राखालून कोस्टल रोड सुरु झाले आहेत'; मात्र ज्या तुलनेत आज शहरातील लोकसंख्या वाढतआहे त्या तुलनेत हे सर्वच मार्ग अपुरे पडून सर्वांचा भार पुन्हा लोकल रेल्वे गाड्यांवरच पडत आहे. लोकल ट्रेन वाहतुकीवर होणारा परिणाम लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी खासगी कंपन्यांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा बदलण्याचे आणि शक्य त्या ठिकाणी वर्क फ्रॉम होम धोरण अवलंबण्याचे आवाहन केले आहे; मात्र या आवाहनाला खासगी कंपन्यांकडून हवा तसा प्रतिसादही मिळताना दिसत नाही. वर्तमानात शहरातील लोकल गाड्यांची वाढती गर्दी पाहिल्यावर आज जी मुले शालेय शिक्षण घेत आहेत ती जेव्हा कमावती होतील तेव्हा त्यांचा लोकल गाड्यांचा प्रवास किती भयावह असेल याची कल्पनाही करवत नाही. लोकल ट्रेनचे अपघात कमी करण्यासाठी सर्व लोकल गाड्या वातानुकलीत आणि स्वयंचलित उघड झाप करणाऱ्या दरवाज्यांच्या करणे नक्कीच सोपे नाही त्यासाठी भरपूर सिद्धता करावी लागेल, ती नाही केली तर रोगापेक्षा इलाज भयंकर होऊ शकतो.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई यांसारख्या शहरातील वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणण्यासाठी उपयोयोजना आखणे आणि त्याची कठोरपणे अंमलबजावणी करणे आज नितांत गरजेचे आहे. दुसरी बाब म्हणजे ज्या सोयी सुविधा आणि रोजगाराच्या संधी या विकसित आणि विकसनशील शहरांत आहेत, त्या देशातील अन्य शहरांत का निर्माण होऊ शकत नाहीत याचाही विचार प्रत्येक राज्याने करणे आवश्यक आहे. राज्यातील बेरोजगारी कमी करायची असेल तर प्रत्येक राज्यांतील प्रत्येक शहरांत मुंबईच्या तोडीच्या सोयी सुविधा आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हायला हव्यात. आपल्या राज्यातील एकही तरुण आपल्या आणि आपल्या कुटुंबियांच्या पोटाची भूक भागवण्यासाठी राज्याच्या बाहेर जाणार नाही याची काळजी प्रत्येक राज्यातील शासनाने घ्यायला हवी. कायद्यानुसार देशात कोणीही कोणत्याही राज्यात किंवा शहरात चाकरी अथवा व्यवसाय करू शकतो हे ऐकायला जरी चांगले वाटत असले, तरी मूळ मुंबईकरांना आज काय हाल सोसावे लागत आहेत हे मुंबईकरांनाच विचारावे.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# शिक्षकांचा फक्त जीव घेणे बाकी आहे..!

काहीही झालं की शिक्षक जबाबदार. आणि काही नाही झाले तरी शिक्षकच जबाबदार.! म्हणजे विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येत नाही तर शिक्षक जबाबदार. विद्यार्थ्यांना कमी मार्क्स मिळाले तरी शिक्षकच जबाबदार.. विद्यार्थ्यांनी गुन्हा केला,काही गैरवर्तन केले तर शिक्षकांना काही कळतच नाही.. ते विद्यार्थ्यांना चांगले शिकवतच नाहीत.

विद्यार्थी स्पर्धेत हरला,पडला तरी शिक्षकच जबाबदार. विद्यार्थ्यांनी अभ्यास नाही केला, होमवर्क पूर्ण नाही केला,म्हणून त्याला रागावलं,थोडं दर्डावाल,त्यांच्या भल्यासाठी एखादी टपली मारली,छोटी मोठी सजा दिली तरी शिक्षकांना काही समजते का? आमच्या मुलांना मारायचा त्यांना कुणी अधिकार दिला?

आमची मुलं शिकतील, नाहीतर नाही शिकतील, पण आमच्या मुलांना मारहाण करायची नाही, दाबदडप करायची नाही, त्यांना जसं वाटेल तसं वागू द्या, बोलू द्या, करू द्या, पण आमच्या पाल्यांवर ओरडू नका, रागावू नका, आणि हो.. त्यांना मारू तर अजिबातच नका..!

जून महिन्यात शाळा सुरु होते न होते तोच विद्यार्थी पट पंधरवाडा, सुरु होतो. लगेचच शाळाबाह्य मुलामुलींचे सर्व्हेक्षण, शाळाबाह्य मुलामुलींना शोधायला जायचे, तिकडे पालकांचे दोन शब्द ऐकून घ्यायचे.. सकाळ सत्रातील शिक्षकांनी शाळा सुटल्यावर तर दुपार सत्रातील शिक्षकांनी शाळा भरण्यापूर्वी हे सर्वेक्षण करावे लागते. त्यात मुंबई शहर व अफाट लोकवस्तीचा भाग कुठे सकल तर कुठे उंच, कुठे झोपडपट्टी तर कुठे बिल्डिंग अशा नानाविध प्रकारच्या भौगोलिक भागातील पालकांची प्रत्यक्ष भेट घ्यायला जाऊन त्यांना त्यांच्या पाल्यांना सरकारी शाळेत पाठवण्याबद्दल परावृत्त करणे.. वाटते तेवढे सोपे आहे का?

शाळा चालू झाली तर लगेच २७ वस्तूंचे वाटप आणि त्याचा हिशोब काटेकोरपणे सांभाळावा लागतो.२७ वस्तू मोफत देऊन सुद्धा काही पालक आपल्या पाल्यांना शाळेत पाठवत नाहीत.कारण त्यांना फक्त त्या २७ वस्तूंचे प्रेम असते. एकदा का या २७ वस्तू आपल्या पाल्याच्या पदरात पडल्या की हे पालक आपल्या पाल्यांना वर्षभर शाळेत पाठवत नाहीत.अनेकदा त्यांच्या घरी जाऊन गृह भेटी दिल्या, त्यांना विनंती, अर्जव केली तरी हे पालक मुलांना शाळेत पाठवायला तयार होत नाहीत.

दुसऱ्या बाजूला पटसंख्या कमी झाल्यामुळे संच मान्यतेमध्ये शिक्षक संख्या कमी होत जाते. वर्षाच्या सुरुवातीचा काळ पावसाळ्याचा, पावसाचे पाणी वर्गात येते,कधी विद्यार्थी भिजत भिजत शाळेत येतात,कधी भिजत घरी जातात. प्रत्येक मूल पालकांच्या हातात देईपर्यंत शिक्षकाची जिम्मेदारी असते. ते शाळेत अथवा घरी वेळेत पोहोचले नाही तरी शिक्षकाची जबाबदारी असते.

अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शिक्षक जिवाचे रान करतात. मध्येच प्रशिक्षणे येतात, मध्येच शिबीरे येतात, मध्येच मोठे मोठे कार्यक्रम येतात, बक्षीस वितरण कार्यक्रम येतात, विविध स्पर्धा येतात. स्पर्धेची तयारी करून घ्यावी लागते. मग एखाद्या प्रशिक्षणाची लिंक भरावी लागते. वेगवेगळ्या माहितीची वेगवेगळी शिक्षक निहाय,शाळा निहाय ऑनलाईन लिंक भरावी लागते.ती केव्हाही भरावी लागते. मध्यान्ह भोजन, त्याचे वाटप, त्याची स्वच्छता त्याचा हिशोब बरोबर द्यावा लागतोच. FLN,पाचवी आणि आठवी या दोन्ही वर्गाची स्कॉलरशिप,विज्ञान कुतूहल,होमी भाभा परीक्षा,गणित गुरुवार,दर शनिवारी टेस्ट,शाळा पोर्टल, नवीन प्रवेश,शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांचे लिव्हिंग सर्टिफिकेट,आणि आताच रिमार्क सह गुणपत्रके बनवून द्यायची. शिक्षक खरोखरच पात्र आहे की नाही याबद्दल नव्यानेच द्यावी लागणारी शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजेच टीईटी/ सिटीईटी.परीक्षेचा अभ्यास ते प्रत्यक्ष परीक्षा हे काही कमी आहे का?

राज्य निवडणूक आयोगाकडून गेल्या चार वर्षापासून शिक्षकांना **BLO** चे काम देण्यात आलेले आहे. हे **BLO** चे काम काही भागात आठवड्यातून तीन दिवस तर काही भागात शाळा करून सुट्टीच्या वेळेत करायचे आहे. त्यामुळे शिक्षकांनी नेमकं करायचे तर काय करायचे?असा यक्ष प्रश्न पडला आहे. निवडणूक आयोगाचे हे काम, मानसिक शारीरिक आणि आर्थिक त्रास देणारे असून हेच काम रोटेशन पद्धतीने जर शिक्षकांना दिले तर शिक्षक हे काम सुद्धा हसत हसत पूर्ण करतील.वेगवेगळ्या विभागाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात अनाधिकृत रित्या काम करणारे व अधिकाऱ्यांचे कान भरणारे काही कर्मचारी त्यांच्या मर्जीतल्या कर्मचाऱ्यांना जाणीवपूर्वक या ड्युटी द्यायला भाग पाडतात. दरवर्षी मिळणाऱ्या हक्काच्या उन्हाळी सुट्टीत शिक्षकांना हे काम अनिच्छेने करावे लागत आहे.शिक्षकांच्या घरी लग्न समारंभ आहेत. भावाच्या,बहिणीच्या व अन्य नातेवाईकांच्या घरी लग्नकार्य,पूजा वा इतर धार्मिक कार्ये आहेत.पण प्रशासनाच्या आडेलतट्टू धोरणामुळे व दुर्दैवाने घरच्या कार्यक्रमांना जाता येत नाही.शिवाय हे **BLO** चे काम पूर्णतः मोफत म्हणजे मोबदलाहिन आहे. सुट्टीच्या काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना किमान तेवढ्या दिवसांची अर्जित रजा मिळणे अपेक्षित आहे.पण प्रशासन तेही देत नाही. दि.१६ मे पासून याच शिक्षकांना भारताच्या जनगणनेचे काम करायचे आहे.तेही तब्ब्ल १४ जून पर्यंत. ते नाही केले तरी शिक्षकांना जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई केली जाईल. मग शेवटी प्रश्न पडतो तो शिक्षकांनी किती आणि कोणकोणती कामे करायची? अन कसे.? या एवढ्या जबाबदाऱ्यांतून शिक्षकाने शिकवायचे कधी? तेही नाही शिकवले तर पुन्हा शिक्षकच जबाबदार..!

अनेक शिक्षकांना विविध व्याधींनी पछाडलेले आहे. कित्येक शिक्षक सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर उभे आहेत. त्यांना तरी या कामातून वगळने अपेक्षित होते. सर्व शिक्षक संघटनांनी अनेकदा प्रशासनाकडे बीएलओ कामातून शिक्षकांना वगळण्याबाबत विनंती केलेली असून सुद्धा शिक्षकांना बी एल ओ च्या कामातून सुटका देण्यात आली नाही. दररोज शिक्षकांच्या अपघाताच्या, आजारपणाच्या बातम्या येत आहेत. प्रशासनाला हे दिसत नाही का?

प्रशासनाने शिक्षकांचे जीव गेले पाहिजेत असे ठरवले आहे का..? आणि जर जीव गेले तरीही .. जबाबदार शिक्षकच का?

**– प्रभाकर हजारे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## आदिबा पठाणची संभाजीनगरात चमक
## सानिया उर्दू हायस्कूलमध्ये ८५.६०% गुणांसह प्रथम क्रमांक



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१२, जिंतूर (परभणी) :** जिल्ह्यातील कोक (ता. जिंतूर) येथील एका सर्वसामान्य कुटुंबाचा संघर्ष, मेहनत आणि शिक्षणावरील विश्वास आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. उदरनिर्वाहासाठी कामाच्या शोधात गाव सोडून संभाजीनगर येथे स्थायिक झालेल्या आरिफ खान पठाण यांनी प्रतिकूल परिस्थितीतही मुलीच्या शिक्षणाशी तडजोड होऊ दिली नाही. भाड्याच्या छोट्याशा घरात राहत दिवस-रात्र मेहनत करत त्यांनी आपल्या लेकीला मोठे स्वप्न पाहायला शिकवले आणि त्या स्वप्नांना आता यशाचे पंख मिळाले आहेत. संभाजीनगर येथील सानिया उर्दू हायस्कूल, हुसैन कॉलनी, न्याय नगर, गारखेडा परिसर येथे शिक्षण घेणारी त्यांची कन्या आदिबा अरिफ खान पठाण हिने महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या एस.एस.सी. परीक्षा मे-२०२६ मध्ये घवघवीत यश मिळवत ८५.६० टक्के गुणांसह शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

आदिबाने ५०० पैकी ४२८ गुण मिळवत आपल्या आई-वडिलांची मेहनत सार्थ ठरवली. विशेष म्हणजे, आर्थिक अडचणी, राहण्याची समस्या आणि शहरातील संघर्षमय जीवन असूनही आरिफ खान यांनी मुलीच्या शिक्षणावर पूर्ण लक्ष केंद्रित केले. मुलगी शिकली तर घर उभं राहतं, हा विश्वास मनात ठेवून त्यांनी प्रत्येक संकटाला सामोरे जात आदिबाच्या शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्न केले. आदिबाने उर्दू, इंग्रजी, मराठी-हिंदी, गणित, विज्ञान व समाजशास्त्र या विषयांमध्ये उल्लेखनीय गुण मिळवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिच्या यशामुळे कोक गावासह जिंतूर तालुक्यात आणि संभाजीनगर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, सानिया उर्दू हायस्कूल चा यंदाचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून सर्व २७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये पठाण इशरत शाकीर (८१.४०%), शेख अर्शिया खलील (७६.२०%), शेख मसीरा निजामुद्दीन (७२.२०%) आणि शेख तस्मिया रशीद (७०.८०%) यांचा समावेश आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच शेख मुश्ताक शेख महमूद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## नगराध्यक्ष चषक स्पर्धा २०२६ अंतिम सामन्यात डॉक्टर संघ विजेता तर पत्रकार संघ उपविजेता

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, बल्लारपूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर नगर परिषदेच्या माध्यमातून ९ मे ते ११ मे २०२६ पर्यंत नगराध्यक्ष चषक स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. याअंतर्गत आयोजित क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना मोठ्या उत्साहात पार पडला. अत्यंत रंगतदार झालेल्या अंतिम सामन्यात डॉक्टर संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकाविले, तर पत्रकार संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. विशेष म्हणजे डॉक्टर संघाने प्रथम फलंदाजी करतांना ८० धावा केल्या तर पत्रकार संघाने निर्धारित षटकात ५० धावा केल्या अशा प्रकारे डॉक्टर संघाने ३० धावानी विजय मिळविला

अंतिम सामन्यात दमदार कामगिरी करणाऱ्या छोटू साठे याला 'मॅन ऑफ द मॅच' पुरस्काराने गौरविण्यात आले. संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण आणि प्रभावी खेळ केल्याबद्दल विशाल तांड्रा याला 'मॅन ऑफ द सिरीज' तसेच बेस्ट बॅट्समन पुरस्कार प्रदान करण्यात आला. उत्कृष्ट गोलंदाजीबद्दल सूरज कवाडे याला बेस्ट बॉलर पुरस्कार देण्यात आला, तर अजय रासेकर याने बेस्ट विकेट किपर चा मान पटकाविला. स्पर्धेत शिस्तबद्ध आणि क्रीडाभाव जपणाऱ्या डॉक्टर संघाला 'फेअर प्ले टीम' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाला नगराध्यक्ष अलका वाढई अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. यावेळी मुख्याधिकारी विशाल वाघ, उपाध्यक्ष देवेंद्र आर्य, नगरसेवक निरज झाडे, अविनाश मट्टा, प्रणित सातपुते, नगर सेविका ॲड मेघा भाले, शिल्पाताई चुट्टे, वैष्णवी जुमडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे मंच संचालन शब्बीर अली, स्वच्छता निरीक्षक यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपमुख्याधिकारी रवींद्र भंडारवार यांनी मानले. स्पर्धेत एकूण १२ संघांनी सहभाग नोंदविला होता.

## ऐरोली जी विभागात अनधिकृत बांधकाम विरोधी कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१२, नवी मुंबई :** महापालिकेच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी काम चालू ठेवल्यामुळे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उपआयुक्त (अतिक्रमण) संजय शिंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई केली.

महापालिकेच्या जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत भु.क्र. ९५/९७, शिवकॉलनी, गल्ली नं ५, सेक्टर १, ऐरोली, नवी मुंबई येथे संतोष सुखदेव प्रसाद यांनी बांधकाम परवानगी व्यतिरिक्त बांधकाम सुरु केले होते. त्यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामांस जी विभाग कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये दि. ०७/०८/२०२५ रोजी नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

सदरचे अनधिकृत बांधकाम साधना पाटील, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी ऐरोली, यांचे नियंत्रणाखाली तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले.

या धडक मोहिमेसाठी जी-विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे अधिकारी / कर्मचारी, मजूर, ब्रेकर, गॅसकटर, तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# प्रदुषणमुक्त नागपुरसाठी स्वतंत्र फाऊंडेशन !

### लघु आणि दीर्घ कालावधीसाठी उपाययोजनांची ब्ल्युप्रिंट तयार करण्याचे निर्देश - पालकमंत्री



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१२, नागपूर :** जिल्ह्यातील ग्रामीण भागासह नागपूर शहरात प्रदुषणाबाबत शेतकरी व नागरिकांच्या वारंवार तक्रारी येत आहेत. विकासासाठी औष्णिक विद्युत प्रकल्पांचे योगदान आवश्यक जरी असले तरी यातून होणाऱ्या प्रदुषणाकडे दुर्लक्षून चालणार नाही. राखेमुळे आजूबाजूच्या पंचक्रोशीतील शेती धोक्यात आली आहे. ज्या भागात औष्णिक विद्युत केंद्र नाहीत अशा भागात पेपरमिल व इतर केमिकल कंपन्यांच्या विषारी पाण्याने नदी-नाले प्रदुषीत झाले आहेत. नागपूरसह जवळच्या नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीमधून वाहणारे पाणी प्रक्रिया न करता थेट नाग-पिवळी-कन्हान-कोलार नद्यांमध्ये मिसळते. यामुळे होणारे प्रदुषण मनाला विषण्ण करणारे आहे. शासन म्हणून याला जे जबाबदार विभाग आहेत त्यांनी कोणत्याही परिस्थितीत प्रदुषण वाढू नये यासाठी कठोर कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

नागपूर शहरातील वाढत्या प्रदुषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी सर्व समावेशक कृती आराखडा तयार करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंग ठाकूर, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त सचिन ढोले पाटील, अधीक्षक अभियंता अब्दुल जावेद, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या वरिष्ठ अधिकारी हेमा देशपांडे व इतर अधिकारी उपस्थित होते.

**दोषी आस्थापना व कंपन्यांवर कठोर कारवाई करा**

प्रदुषणमुक्त नागपूर जिल्ह्याचा आराखडा तयार करताना केवळ शासकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या टिपण्यांचा विचार न करता जिल्ह्यातील या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रतिथयश सेवाभावी संस्था, या क्षेत्रातील तज्ज्ञ यांच्यासह मोठ्या प्रमाणात लोकसहभागाचा विचार केला पाहिजे असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील जवळपास ४२ गावे प्रदुषणाने त्रस्त झाली आहेत. याचे उत्तरदायित्व हे शासनाला स्वीकारावेच लागेल. प्रदुषण नियंत्रण मंडळाने त्यांना दिलेल्या अधिकारांचा काटेकोर वापर करुन ज्या दोषी कंपन्या असतील अथवा संस्था असतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे. यात शासकीय विभाग असतील अथवा स्थानिक स्वराज्य संस्था असतील त्यांना नोटीसा बजावण्याचे व कारवाई करण्याचे त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले.

**प्रदुषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी सर्व समावेशक कृती आराखडा**

या कामाची व्याप्ती ही मोठी आहे. लोकजागरासह प्रत्येकाने प्रदुषणाबाबत विचार केला पाहिजे. भविष्यातील कामाचे नियोजनाची व्याप्ती लक्षात घेता यासाठी स्वतंत्र फाऊंडेशन तयार करावे लागेल असे सूतोवाच त्यांनी केले. महानगरपालिकेचे आयुक्त, एनएमआरडीएचे प्रमुख, जिल्हा परिषद, जिल्हा प्रशासन, प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी एकत्र येऊन पुढील तीन महिन्याच्या आत भविष्यातील प्रदुषणमुक्त नागपूरचा कृती आराखडा सादर करण्यास पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. हा आराखडा एकात्मिक असण्यासह प्रत्येकाच्या जबाबदाऱ्या निश्चित करुन देणारा असावा असे त्यांनी स्पष्ट केले.

**सेवाभावी संस्था व पर्यावरण तज्ज्ञांचा सन्मानाने सहभाग घ्या...**

पर्यावरणाच्या क्षेत्रात निरी सारख्या संस्थेचा यात सहभाग घेता येईल. याचबरोबर ज्या सेवाभावी संस्थांनी व पर्यावरण तज्ज्ञांनी चांगले काम केले आहे अशा व्यक्ती व संस्थांचा सन्मानाने सहभाग करुन घेण्याचे त्यांनी सांगितले. सर्वांच्या अथक प्रयत्नातून नियोजनबध्द काम केले तर २०४७ पर्यंत आपले नागपूर प्रदुषणमुक्त करु असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या बैठकीत सोना अग्रो कंपनी, नगरधन येथील राख, खापरखेडा येथील काळा धूर/राख व दुषीत पाणी, हेटी एमआयडीसी परिसरात पेपरमिलद्वारे होणारे प्रदुषण आदी बाबत बैठकीत गंभीर चर्चा झाली.

## पर्यटकांसाठी सुरक्षित सुसज्ज पार्किंगसह वाहतूक कोंडी रोखण्यासाठी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांचा पुढाकार



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१२, माथेरान :** पर्यटनस्थळ म्हणून देशभर प्रसिद्ध असलेल्या माथेरान येथे वर्षभर पर्यटकांची मोठी गर्दी होत असते. विशेषतः सुट्ट्यांच्या काळात दस्तुरी नाका परिसरात वाहनांची प्रचंड वर्दळ वाढत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनत होती. या पार्श्वभूमीवर माथेरान नगरपालिकेचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी माऊंट बेरी पॉईंट येथे छोट्या वाहनतळाची संकल्पना राबवत दस्तुरी पार्किंग व्यवस्थेमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणली आहे.

दस्तुरी नाक्यावरील प्रवासी कर आकारणी केंद्रासमोरील गायमुख परिसरात टॅक्सी संघटनेच्या गाड्या उभ्या राहत असल्यामुळे एकेरी वाहतुकीत मोठ्या प्रमाणावर अडथळे निर्माण होत होते. यामुळे खाजगी वाहनांची लांबच लांब रांग लागत होती. ही समस्या लक्षात घेऊन नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी दस्तुरी पार्किंगलगत असलेल्या माऊंट बेरी पॉईंट परिसरातील मोकळ्या जागेचा वापर टॅक्सी पार्किंगसाठी करण्याचा प्रस्ताव मांडला होता. त्याला टॅक्सी चालक-मालक संघटनेने सकारात्मक प्रतिसाद दिल्याने आता त्या ठिकाणी काही प्रमाणात गाड्या पार्क होऊ लागल्या आहेत. त्यामुळे वाहतूक सुरळीत होण्यास मदत मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.

● माथेरानचे मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावरून दररोज हजारो पर्यटक ये-जा करतात. त्यांच्या वाहनांसाठी सुरक्षित पार्किंग आणि वाहतूक कोंडीमुक्त व्यवस्था असणे आवश्यक आहे. पर्यटकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत. माऊंट बेरी परिसरात आवश्यक तेथे पेव्हर ब्लॉक टाकून अधिक चांगली सुविधा उपलब्ध करून देण्याचाही आमचा मानस आहे.

**- चंद्रकांत चौधरी (नगराध्यक्ष माथेरान)**

● यावेळी आम्हाला दस्तुरी पार्किंगमध्ये अगदी सहज गाडी पार्क करता आली. गेल्या वर्षी जागा न मिळाल्याने आम्हाला माथेरानला न येताच लोणावळ्याकडे जावे लागले होते. यंदाची व्यवस्था निश्चितच समाधानकारक आहे.

**- शंतनू आपटे**

याचबरोबर दस्तुरी नाक्यावर पर्यटकांच्या वाहनांच्या सुरक्षिततेसाठी पार्किंग परिसरात विजेचे पोल बसविण्याचे काम सुरू करण्यात आले असून लवकरच संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही कॅमेरेही बसविण्यात येणार आहेत. पूर्वी पार्किंगची योग्य व्यवस्था नसल्यामुळे पर्यटकांना जंगल परिसरात वाहने उभी करावी लागत होती. अनेकदा पार्किंग अभावी पर्यटकांना माथेरानऐवजी अन्य पर्यटनस्थळांचा पर्याय निवडावा लागत होता. तसेच वाहनांमधून सामान चोरी आणि दुचाक्यांमधून पेट्रोल चोरीच्या घटनाही घडत होत्या.

या सर्व बाबींवर उपाय म्हणून दस्तुरी परिसरातील अतिक्रमित जागा मोकळी करून सुसज्ज पार्किंगची सुविधा निर्माण करण्यात आली असून आता जवळपास दोनशेहून अधिक वाहने सहजपणे पार्क केली जाऊ शकतात.

नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी स्वतः माऊंट बेरी पॉईंट व दस्तुरी पार्किंग परिसराची पाहणी करून संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी नगरसेवक केतन रामाणे, सामाजिक कार्यकर्ते निखिल शिंदे, दिलीप सकपाळ, शाकिर मुजावर तसेच अन्य नागरिक उपस्थित होते.

## डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानकडून पेण उपजिल्हा रुग्णालयाला ७० वैद्यकीय उपकरणांची वाटप



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१२, पेण :** ज्येष्ठ निरूपणकार महाराष्ट्र भूषण डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या मार्फत पद्मश्री डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी व रायगड भूषण सचिनदादा धर्माधिकरी यांच्या मार्गदर्शनाखाली पेण येथील पेण उपजिल्हा रुग्णालयाला तब्बल ७० प्रकारची वैद्यकीय उपकरणे, औषधे व आरोग्य साहित्याचे वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम मंगळवार दि. १२ मे रोजी पेण येथील मराठा समाज हॉलमध्ये उत्साहात पार पडला. आरोग्य सेवेला अधिक सक्षम आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास श्री सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.

या प्रसंगी पेण नगरपालिकेचे मुख्याधिकारी जीवन पाटील, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, उप परिवहन कार्यालयाचे अधिकारी गुलाब सोळंकी, तसेच पेण उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक संध्यादेवी राजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत वैद्यकीय उपकरणांचे वितरण करण्यात आले.

प्रतिष्ठानच्या माध्यमातून रुग्णालयाला देण्यात आलेल्या साहित्यामध्ये मल्टीपॅरा मॉनिटर, डिजिटल बीपी मशीन, डिफिब्रिलेटर मशीन, फोटोथेरपी युनिट, ऑक्सिजन फ्लो मीटर, व्हीलचेअर, संगणक संच, सर्जिकल साहित्य, विविध इंजेक्शन्स, औषधे तसेच इतर अत्यावश्यक वैद्यकीय साहित्याचा समावेश आहे. पेण नगरपालिकेचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी आपल्या मनोगतात डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, प्रतिष्ठानचे कार्य पाहून अक्षरशः भारावून गेलो आहे.

अध्यात्मिक क्षेत्रात संत साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्याची विचारधारा जपत प्रतिष्ठान विविध सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबवत आहे. स्वच्छता अभियान, आरोग्य शिबिरे, नदी-तलाव संवर्धन यांसारख्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत आहे. हे कार्य केवळ आपल्या देशातच नव्हे तर परदेशातही पोहोचले असून प्रतिष्ठानचे योगदान अत्यंत प्रेरणादायी आहे.

ते पुढे म्हणाले की, पेण नगरपालिकेच्या हद्दीत देखील नदी संवर्धन व स्वच्छता मोहिमांमध्ये श्री सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. खऱ्या अर्थाने समाजसेवा आणि कार्य कसे असावे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान होय.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम होण्यास मदत होत असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन श्री सदस्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडले.

# महाबळेश्वर येथील रस्ते कमाचा निकृष्ट दर्जा

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१२, महाबळेश्वर (सातारा) :** जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या महाबळेश्वर येथे लाखो पर्यटक भेट देत असतात महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेमार्फत शहरात सुरू असलेल्या रस्ते काँक्रिटीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता आणि निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचा आरोप करत, शहरातील विरोधी नगरसेवकांनी दिनांक ११ मे २०२६ रोजी नगरपरिषद प्रशासनाला धारेवर धरले. ठेकेदाराच्या मनमानी कारभाराचा जाब विचारण्यासाठी सर्व नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या मांडला.

महाबळेश्वर शहरात सध्या रस्ते काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. या कामाची पाहणी करण्यासाठी नगर सेवक कुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवकांनी अचानक भेट दिली असता, कामाचा दर्जा अत्यंत सुमार असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. निविदेतील अटी आणि शर्तींचे उल्लंघन करून हे काम केले जात असल्याचे दिसून आले.

निकृष्ट काँक्रीट : रस्ते कामासाठी 'M40' ग्रेडचे काँक्रीट वापरणे बंधनकारक असताना, प्रत्यक्षात अतिशय हलक्या दर्जाचे काँक्रीट वापरले जात आहे. रस्ता तयार करताना पेव्हर मशीन आणि व्हायब्रेटर रोलरचा वापर करणे आवश्यक आहे, मात्र ठेकेदाराकडून केवळ काँक्रीट ओतून थातूरमातूर काम केले जात आहे.

कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे सॅम्पल ब्लॉक (Sample Blocks) घेतलेले नाहीत, तसेच बॅच रिपोर्टही उपलब्ध नाहीत. सिव्हिल इंजिनिअर असतानाही या कामाचा पदभार मेकॅनिकल इंजिनिअरकडे का सोपविण्यात आला, असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला.

नगरसेवकांनी तक्रार केल्यानंतर इंजिनिअरने क्वालिटी रिपोर्ट येईपर्यंत



काम थांबवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आज सकाळी 'जेव्हीडी एम्पायर' या ठेकेदाराने पुन्हा घाईघाईने निकृष्ट दर्जाचे काम सुरू केल्याने नगरसेवक अधिकच संतप्त झाले. हा जनतेचा पैसा आहे आणि तो ठेकेदाराचे घर भरण्यासाठी नाही, तर नागरिकांच्या सोयीसाठी वापरला गेला पाहिजे.

महाबळेश्वरमध्ये येणाऱ्या पर्यटकांना आणि स्थानिक नागरिकांना चांगल्या सुविधा मिळणे हा त्यांचा हक्क आहे. या भ्रष्ट कारभाराविरोधात आम्ही जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागणार आहोत असल्याचे नगर सेवक किशोर शिंदे यांनी या प्रसंगी सांगितले.या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषी ठेकेदारावर कडक कारवाई करावी आणि कामाची सखोल चौकशी व्हावी, या मागणीसाठी सर्व विरोधी नगरसेवक आता जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत.

प्रशासनाने यावर योग्य कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ही देण्यात आला आहे. यावेळी नगरसेवक सेवक कुमार शिंदे, राजुभाई नालबंद, शबाना मानकर, मिलिंद ढेबे, विजय बिरामणे उपस्थित होते.

# पारनेरच्या वीज प्रश्नांवर मुंबईत उच्चस्तरीय बैठक

## धोत्रे येथे २२० के.व्ही. उपकेंद्राला गती; बाभुळवाडा ट्रान्सफॉर्मर क्षमतावाढीचे तातडीचे आदेश



धोत्रे येथे मंजूर असलेल्या नवीन २२० के.व्ही. उपकेंद्र तातडीने उभारणीची आवश्यकता आहे, हे उपकेंद्र लवकरात लवकर कार्यान्वित झाल्यास प्रत्येक ३३/११ के.व्ही. उपकेंद्राला स्वतंत्र वाहिनीद्वारे वीजपुरवठा करणे शक्य होणार असून कमी दाब, वारंवार खंडित होणारा पुरवठा व तांत्रिक बिघाडाच्या समस्यांपासून मोठा दिलासा मिळणार असल्याचे ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांचे निदर्शनास आणून दिल्याने मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना धोत्रे येथील प्रस्तावित उपकेंद्राचे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक बदल करून तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहे.

**- आ.काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेरच्या वीज प्रश्नांवर मुंबईत उच्चस्तरीय बैठक पारनेर तालुक्यातील वाढत्या वीज समस्यांबाबत आमदार काशिनाथ दाते यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

यावेळी महापारेषण संचालक सतीश चव्हाण, कार्यकारी संचालक धनंजय औंडेकर, अधिक्षक अभियंता प्लॉनिंग दाभरडे, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण उपस्थित होते. बैठकीत पारनेर तालुक्यातील कमी दाबाचा वीजपुरवठा, लांब पल्ल्याच्या ३३ के.व्ही. वाहिन्या, अपुरी ट्रान्सफॉर्मर क्षमता तसेच नवीन उपकेंद्र उभारणी या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

पारनेर तालुक्यात सध्या सुपा व बाभुळवाडा येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र असून, केडगाव (जि.अहिल्यानगर), शिरूर व आळेफाटा (जि.पुणे) येथूनही विविध ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांना वीजपुरवठा केला जात आहे. मात्र अनेक वाहिन्यांची लांबी ४० ते ५० किलोमीटरपर्यंत असल्याने कमी दाबाने वीजपुरवठा, वारंवार तांत्रिक बिघाड आणि दुरुस्तीसाठी होणारा विलंब यामुळे ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे आमदार दाते यांच्या माध्यमातून बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले.

आळेफाटा येथून येणाऱ्या ३३ के.व्ही. वाहिनीवर अळकुटी, आणे, पळसपूर व वारणवाडी अशी चार उपकेंद्रे जोडलेली असून या वाहिनीची लांबी तब्बल ५० कि.मी. आहे. तसेच बाभुळवाडा येथून निघणाऱ्या सहा वाहिन्यांवर कान्हूर पठार, टाकळी ढोकेश्वर व निघोज परिसरातील प्रत्येकी दोन उपकेंद्रे जोडलेली आहेत. केडगाव येथून येणाऱ्या वाहिनीवर भाळवणी, गोरेगाव व ढवळपुरी ही उपकेंद्रे जोडलेली असून वाहिन्यांचे अंतर जास्त असल्याने वारंवार अडचणी निर्माण होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

वडगाव सावताळ – वनकुटे परिसरातील नवीन सबस्टेशनच्या मागणीबाबतही सकारात्मक चर्चा झाली. संबंधित प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना देत त्यावर लवकरच कार्यवाही केली जाईल, असा विश्वास मंत्री बोर्डीकर यांनी व्यक्त केला तर खडकवाडी व अळकुटी येथे नवीन सेक्शनच्या मागणीवर ग्राहकसंख्येचा आढावा घेऊन निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

दरम्यान, बाभुळवाडा येथील १३२ के.व्ही. उपकेंद्रात सध्या कार्यरत असलेल्या २५ चतअ क्षमतेच्या दोन पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढवून प्रत्येकी ५० MVA करण्यास मंजुरी मिळालेली असून त्याची अंमलबजावणी रखडल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले. यावर मंत्री बोर्डीकर यांनी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# रात्री १० नंतर वाद्य वाजवल्यास साउंड सिस्टिम चालक, मंगल कार्यालय मालक व आयोजकांवर गुन्हा दाखल

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१२, राहुरी (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या आदेशानुसार राहुरी पोलीस स्टेशन येथे दिनांक ११ मे २०२६ रोजी साउंड सिस्टिम चालक, मंगल कार्यालय मालक तसेच संबंधित व्यावसायिकांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीचे मार्गदर्शन राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी केले.

बैठकी दरम्यान रात्री १० वाजल्यानंतर कोणत्याही प्रकारचे मोठ्या आवाजातील वाद्य, डीजे, साउंड सिस्टिम तसेच फोटोग्राफी व व्हिडिओग्राफीसाठी वापरण्यात येणारी ध्वनी उपकरणे सुरू ठेवल्यास संबंधित साउंड सिस्टिम चालक, मालक, मंगल कार्यालय चालक, कार्यक्रम आयोजक तसेच ग्राहकांवर ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) कायदा २००२ अन्वये कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.पोलीस प्रशासनाकडून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. रात्री उशिरापर्यंत मोठ्या आवाजात डीजे व साउंड सिस्टिम सुरू ठेवल्यामुळे ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, रुग्ण तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी पोलीस प्रशासनाकडे वारंवार प्राप्त होत आहेत. यावेळी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी सर्व साउंड सिस्टिम चालक व मंगल कार्यालय मालकांना शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणतीही दया दाखविली जाणार नसून थेट गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच विवाह समारंभ, वाढदिवस,



धार्मिक कार्यक्रम किंवा इतर कोणत्याही कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपकाचा वापर करताना निर्धारित वेळेचे पालन करणे बंधनकारक असल्याचे सांगण्यात आले.

कार्यक्रम आयोजकांनी पोलीस प्रशासनाची पूर्वपरवानगी घेऊनच साउंड सिस्टिमचा वापर करावा, असे आवाहनही बैठकीत करण्यात आले. राहुरी पोलीस प्रशासनाच्या या निर्णयामुळे रात्रीच्या वेळी होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाला आळा बसण्यास मदत होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांचे कागदपत्रे तात्काळ द्या - नगरसेविका गायकवाड यांची मागणी

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१२, कुंडलवाडी (नांदेड) :** दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र तसेच इतर शासकीय कागदपत्रे तात्काळ उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी नगर परिषद बिलोलीच्या नगरसेविका अनुपमा महेंद्र गायकवाड यांनी तहसीलदार यांना दिलेल्या



निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, दहावी व बारावीचे निकाल जाहीर झाल्यानंतर महाविद्यालयीन प्रवेश, शिष्यवृत्ती, व्यावसायिक अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा व विविध शैक्षणिक प्रक्रियांसाठी विद्यार्थ्यांना विविध दाखल्यांची तातडीची आवश्यकता भासत आहे. मात्र तहसील कार्यालयात दाखल्यांसाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून विद्यार्थी व पालकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. तसेच ऑनलाइन प्रक्रियेमधील तांत्रिक अडचणी, विलंब व अपुरी कर्मचारी व्यवस्था यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, महिला, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना वारंवार कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत असल्याने आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची खंतही व्यक्त करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या अर्जांना प्राधान्य देऊन तात्काळ मंजुरी द्यावी, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र काउंटर सुरू करावा, अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करावेत तसेच शैक्षणिक प्रवेशाची अंतिम मुदत लक्षात घेऊन विशेष दाखला वितरण मोहीम राबवावी, अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी अनुपमा महेंद्र गायकवाड यांनी केली आहे.

# थोडक्यात

## भ्रष्टाचाराला चाप लावण्यासाठी 'व्हिडिओ रेकॉर्डिंग' ची परवानगी द्या



**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.१२, शहापूर (ठाणे) :** माहिती अधिकार कायद्यांतर्गत केल्या जाणाऱ्या कामकाजात पारदर्शकता यावी आणि माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सुटावा, या प्रमुख मागण्यांसाठी 'माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ' (शहापूर तालुका) यांच्या वतीने शहापूरचे तहसीलदार परमेश्वर कुसळे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक पी. आय. कदम यांना लेखी निवेदन देण्यात आले. माहिती मागवणाऱ्या कार्यकर्त्यांना मिळणारी वागणूक आणि त्यांच्या जिवाला असणारा धोका लक्षात घेता प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी यावेळी करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, अनेकदा शासकीय कार्यालयांमध्ये माहितीची पाहणी करताना पारदर्शकतेचा अभाव दिसून येतो. अशा वेळी कोणताही गैरप्रकार टाळण्यासाठी आणि पुराव्यादाखल संबंधित कामकाजाचे 'व्हिडिओ रेकॉर्डिंग' करण्याची अधिकृत परवानगी मिळावी, अशी आग्रही मागणी महासंघाने केली आहे. माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २ (जे) नुसार माहिती मिळवण्याच्या अधिकारात 'इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा' समावेश होतो, याचा दाखलाही निवेदनात देण्यात आला आहे.

**कार्यकर्त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर !**

माहिती अधिकार कार्यकर्ते जेव्हा मोठ्या घोटाळ्यांचा पर्दाफाश करतात, तेव्हा त्यांच्या जिवाला धोका निर्माण होतो. संवेदनशील प्रकरणांमध्ये माहितीची पाहणी करताना किंवा प्रत्यक्ष स्थळ पाहणी करताना कार्यकर्त्यांना पोलीस संरक्षण मिळावे, अशी मागणी पोलीस प्रशासनाकडे करण्यात आली आहे. तसेच, शासकीय कार्यालयांमध्ये कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक मिळावी आणि ज्या कक्षात माहितीची पाहणी केली जाते तिथे सीसीटीव्ही कॅमेरे असावेत, जेणेकरून कामकाजात स्पष्टता राहील आणि भ्रष्टाचाराला आळा बसेल.

या निवेदनावर महासंघाचे शहापूर तालुका उपाध्यक्ष गणेश दत्तात्रय गायकर यांच्यासह महिला अध्यक्ष (वाशिंद विभाग) राजश्री संजय भोईर

पत्रकार अक्षय गिरा जागृत नागरिक दिपक पवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. प्रशासनाने या मागण्यांची दखल घेऊन तातडीने योग्य ते आदेश द्यावेत, माहिती अधिकार कायद्याच्या मूळ उद्देश पारदर्शक काम करण्यात यावे या निवेदनामुळे आता प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ट्रकचालकांना लुटणाऱ्या तरुणांना मंद्रूप पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१२, सोलापूर :** सोलापूर येथून आयशर टेम्पोमध्ये कांदा घेऊन बंगळुरूकडे निघालेल्या एका टेम्पोचालकाला कुरघोट येथे तीन युवकांनी 'या मार्गावरून जायचे असेल तर एन्ट्री दे' असे म्हणून जबरदस्तीने खिशातून पैसे काढून घेतले होते, याबाबत तक्रार दाखल झाल्यावर मंद्रूप पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत तीन आरोपींना तातडीने अटक करून त्यांना बेड्या ठोकल्या आहेत.

सूर्यकांत परसणा रगटे (वय ४५, रा. कुरघोट, ता. द. सोलापूर) हे पैगंबर रहेमान मकानदार (रा. टाकळी) यांच्या आयशर टेम्पोवर चालक म्हणून काम करतात. रगटे हे या गाडीतून सोलापूर सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीमधून कांदा भरून कर्नाटकातील बंगळुरूकडे निघाले होते.

सायंकाळी चार वाजता बरूर ते टाकळी रस्त्यावरील ओढ्याजवळ बरूर शिवारात त्यांना रोहित रमेश चौगुले (वय ३२), रोहन रमेश चौगुले (वय ३१, दोघेही रा. बरूर,

ता. द. सोलापूर) व अन्य एकजण या तिघांनी मिळून टेम्पोला हात करून थांबविले. यावेळी तिघांनी 'येथून जायचे असेल तर आम्हाला पैसे दे', असे म्हणून पैशांची मागणी केली. यावेळी रगटे यांनी माझ्याकडे पैसे नाहीत असे सांगितले. यावेळी आरोपीने रगटे यांना गाडीच्या खाली उतरविले. यावेळी चालक रगटे यांनी माझ्याकडे पैसे नाहीत अशी विनवणी केली; परंतु आरोपींनी रगटेंच्या पॅन्टच्या खिशात खर्चाकरिता ठेवलेले दोन हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले.

**मंद्रूप पोलिसांची कारवाई :** यापूर्वी मंद्रूप येथे अशाच प्रकारच्या घटनेवरून एका चालकाला मंद्रूपच्या काही तरुणांनी वीस हजार रुपयांनी लुटले होते. अवघ्या काही तासातच तपासाची चक्रे वेगाने फिरवून पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांनी आरोपींना अवघ्या सहा तासांत ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला होता. आता कुरघोटच्या घटनेतही काही तासातच आरोपींना ताब्यात घेण्यात मंद्रूप पोलिसांना यश आले आहे. पोलीस निरीक्षक पटवारी यांच्या कार्यशैलीमुळे अवघ्या काही तासांतच गुन्ह्याचा छडा लागत असल्यामुळे जनतेतून समाधान व्यक्त केले जात आहे. मंद्रूप पोलिसांनी कामगिरीत असेच सातत्य ठेवावे, अशी अपेक्षा ग्रामस्थांतून होत आहे.

**गाड्या अडवल्या तर पोलिसांशी संपर्क साधा !**

मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावांमध्ये जाणाऱ्या वाहनांना जर कोणी अडवून पैसे मागत असेल अथवा कोणी लुटत असेल तर संबंधित चालकांनी घाबरून न जाता तत्काळ मंद्रूप पोलिसांशी ०२१७-२२५५५३३ या क्रमांकावर संपर्क साधावा. मंद्रूप पोलीस आरोपीच्या मुसक्या आवळतील, असे आवाहन मंद्रूप पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांनी केले आहे.

## विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनची सानुग्रह अनुदान करिता द्वारसभा संपन्न

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१२, नागपूर :** कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान आणि तंत्रज्ञ कर्मचारी यांच्या इतर प्रलंबित मागण्या करिता विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन १०२९ शाखा खापरखेडा येथील झोन व शाखा पदाधिकारी आणि सभासद यांची खापरखेडा वीज केंद्राच्या मुख्य द्वारासमोर माजी केंद्रीय उपाध्यक्ष गजानन सुपे यांच्या अध्यक्षतेखाली द्वारसभा पार पडली. खापरखेडा झोन सहसचिव प्रमोद खणके यांनी सभेला संबोधित करताना सानुग्रह अनुदान का मिळाला पाहिजे, लवकर पदोन्नती न काढल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या ऋज वर काय परिणाम होतो हे सांगितले. खापरखेडा झोन सचिव नंदकिशोर पाहुणे यांनी खापरखेडा येथे तंत्रज्ञ कर्मचारी यांचा ५६% स्टाफ रिक्त असताना सुद्धा कर्मचारी तणावात कार्य करीत असताना नवीन तंत्रज्ञ ३ भरती बाबत व्यवस्थापन कसे उदासीन आहे तसेच २५० व ६६० मेगावाटच्या सर्व संचात प्रभारक श्रेणी १ व २ ची पदे निर्माण करण्यात यावी हे नमुद केले. खापरखेडा झोन अध्यक्ष संजीवकुमार गर्जे यांनी तंत्रज्ञ वर्गासाठी विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन कशाप्रकारे कार्य करते हे सांगीतले. कोराडी झोन अध्यक्ष पुरुषोत्तम साबळे यांनी संघटना कर्मचाऱ्यांचे हीत जोपासून कशा पद्धतीने निर्णय घेते हे विषेद केले. याप्रसंगी माजी केंद्रीय उपाध्यक्ष शैलेंद्र अर्जितवार यांनी बोनस ते सानुग्रह अनुदान याचा इतिहास सांगितला. द्वारसभेचे अध्यक्ष माजी केंद्रीय उपाध्यक्ष गजानन सुपे यांनी सभासदाने नेहमी संघटने सोबत राहावे तसेच संघटनेच्या प्रत्येक आंदोलनात उस्फूर्तपणे सहभागी व्हावे हे सांगितले. द्वारसभेचे संचलन आणि आभार प्रदर्शन शाखा सहसचिव अंगद शितळे यांनी केले. द्वारसभेला कोराडी झोन पदाधिकारी आणि शाखा पदाधिकारी हे प्रामुख्याने उपस्थित होते. शाखा खापरखेडा झोन पदाधिकारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.